# अरे संसार संसार

अरे संसार संसार
झालो आम्ही बेजार
महागाईचा भस्मासुर
करतो मना चिंतातुर

संपली नोकरी
झालो मी रिटायर
थांबली अमदानी
खर्च वाढला फार

अन्न, वस्त्र, निवाराही
मना करतो चिंतातुर
कसे भागणार आता
लागते जीवा हुरहूर

घेउनि अपार कष्ट
मुलांना दिले शिक्षण
बदलला जमाना आता
बदलले त्यांचे विचार

घरातली लाडकी बाळे
मोठी होता गेली दूर
नोकरी, संसारात त्यांच्या
गुंतली ती फार

म्हातारी आम्ही दोघे
खोकून खोकून झालो बेजार
औषधपाण्यासाठी पैसा
आता पुरणार कुठवर

सतत दारी येती
नाना व्याधी, आजार
वृद्ध आम्ही दोघे
झालो पुरते जर्जर

ये दिवस सरता सरता
प्रार्थितो देवा तुला
येउ दे थोडी करुणा
आमुच्या वाट्याला

■

– पद्माकर चित्रे
('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)